प्रेस नोट दिनांक २५/०५/२०१९

# समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर

## अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून पळवुन नेलेल्या तरुणास अटक

पुणे जिल्ह्यामधील उरुळी कांचन येथे राहणारी एक महिला ही तिचे १७ वर्षे वयाचे अल्पवयीन मुलीसह नानापेठ, पुणे येथे दिनांक १६/०५/२०१९ रोजी भाजी मंडई येथे बाजार करण्यासाठी आली होती. बाजार झाल्यानंतर त्या महिलेने राजेवाडी नानापेठ पुणे याठिकाणी राहणारे तिच्या नातेवाईकांचे घरी मुलीला राहण्यास सोडून ती महिला उरुळी कांचन येथे आपल्या घरी परत निघुन गेली होती. त्याच दिवशी सायंकाळी ०७/०० वा. चे सुमारास त्या महिलेने आपली मुलीची खुशाली विचारण्यासाठी सदर नातेवाईक महिलेशी संपर्क साधला तेंव्हा त्या महिले ने सांगितले की, तुझी मुलगी दुपारी ०३/०० वा. पासून घरी नाही. तेंव्हा त्या महिलेने व तिचे घरातील लोकांनी सदर १७ वर्षे वयाचे अल्पवयीन मुलीचा त्यांचे ओळखीचे लोक आणि नातेवाईकांकडे शोध घेतला. मुलगी राहण्यास असलेल्या उरुळी कांचन पुणे येथील इमारतीमधील मुलगा नामे- बादल उस्मान मुजावर रा. उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे हा देखील त्याच दिवशी दुपारपासून गायब झाला असल्याचे लक्षात आले. त्यामुळे मुलीच्या आईने बादल मुजावर याने त्यांचे १७ वर्षे वयाचे अल्पवयीन मुलीस त्यांचे कायदेशिर रखवालीतून , पळवून नेले असलेबाबत तक्रार दिल्याने समर्थ पोलीस ठाणे पुणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर- १५३/२०१९ भा.द.वि. कलम- ३६३ अन्वये नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक संदिप साळुंखे यांचेकडे देण्यात आला होता. पोउपनि साळुंखे यांनी गुन्ह्यातील अल्पवयीन पिडीत मुलगी व आरोपी यांचे मित्र मैत्रिणी यांस विश्वासात घेवून त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता गुन्ह्यातील आरोपी हा पिडीत अल्पवयीन मुलीस घेवून अहमदनगर या ठिकाणी असल्याची माहीती प्राप्त झाल्याने. तात्काळ वरिष्ठांना त्याबाबत कळवून पोउपनि साळुंखे व स्टाफ असे अहमदगर याठिकाणी जावून आरोपी बादल मुजावर यास पिडीत अल्पवयीन मुलीसह ताब्यात घेवून समर्थ पोलीस ठाणे येथे आणले. तसेच सदर आरोपीने फिर्यादी यांचे संमतिशीवाय कायदेशिर रखवालीमधून, अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून पळवुन नेलेचे आढळून आल्याने त्यास गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.